नवीन अभ्यासक्रम

प्रथम वर्ष वाणिज्य

सत्र-२

# व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता-II

डॉ. किशोर शंकर निकम

योगेश लक्ष्मण भास्कर

सुरेश आत्माराम देवढे

CBCS PATTERN



NIRALI PRAKASHAN
ADVANCEMENT OF KNOWLEDGE

जून 2019 पासून बदललेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार (CBCS Pattern)
लिहिलेले एकमेव उत्कृष्ट क्रमिक पुस्तक !

नवीन अभ्यासक्रम

# व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता-II

## Business Environment and Entrepreneurship - II

## एफ.वाय.बी.कॉम

**सेमिस्टर-2**

**CBCS Pattern**


**• लेखक •**

**डॉ. किशोर शंकर निकम**

एम.कॉम., नेट, डी.टी.एल., सी.ए., एम.बी.ए., पीएच्.डी.
विभाग प्रमुख वाणिज्य विभाग, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील,
आर्टस्, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स महाविद्यालय, पिंपरी, पुणे

**प्रा. योगेश लक्ष्मण भारस्कर**

एम.ए., एम.एड.
सेट व नेट (अर्थशास्त्र आणि शिक्षणशास्त्र)
सहायक प्राध्यापक,
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,
भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिन्नर, जि. नाशिक

**प्रा.सुरेश आत्माराम देवढे**

एम.कॉम., एम.फिल, सेट व नेट,
जी.डी.सी अ‍ॅन्ड ए.
सहायक प्राध्यापक,
गेनबा सोपानराव मोझे वरिष्ठ महाविद्यालय,
पुणे 411 006


**किंमत : ₹ 65.00**


NIRALI PRAKASHAN
ADVANCEMENT OF KNOWLEDGE

N5132

**व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता-II ISBN 978-93-89686-77-7**
**प्रथम आवृत्ती : डिसेंबर 2019**
**© : डॉ. निकम, प्रा. भारस्कर, प्रा. देवढे**
**प्रकाशक** **(Poly Plate)** **मुद्रक**

**निराली प्रकाशन**
अभ्युदय प्रगती, १३१२, शिवाजीनगर,
जंगली महाराज रोड, पुणे ४११ ००५.
☎ (०२०) २५५१ २३३६/३७/३९
फॅक्स : (०२०) २५५१ १३७९.
Email : niralipune@pragationline.com

**योगिराज प्रिंटर्स अॅन्ड बाइंडर्स**
सर्व्हे नं. १०/१, घुले इंडस्ट्रिअल इस्टेट,
नांदेड गाव रोड, ता. हवेली,
पुणे - ४११ ०४१.
मो. : ९८५००४६५१७/९४०४२३३०४१

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण**

**प्रगती बुक सेंटर : पुणे :** Email : pbcpune@pragationline.com
- १५७, बुधवार पेठ, रतन टॉकिजसमोर, **पुणे २. मो.** ९६५७७०३१४८
- ६७६/ब, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिरासमोर, **पुणे २. मो.** ९६५७७०३१४७
- २८/अ, बुधवार पेठ, अंबर चेंबर, अप्पा बळवंत चौक, **पुणे** २.
  **मो.** ९६५७७०३१४२/९६५७७०३१४९
- १५२, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराशेजारी, **पुणे २.** ☎ ८०८७८८१७९५

**प्रमुख वितरण केंद्रे**

**निराली प्रकाशन : पुणे**
- ११९, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिर मार्ग, **पुणे ४११ ००२.** ☎ (०२०) २४४५ २०४४
  **मो.** ९६५७७०३१४५ Email : niralilocal@pragationline.com

**निराली प्रकाशन :**

**धायरी (पुणे)**
- सर्वे नं. २८/२७ धायरी-कात्रज रोड, पारी कंपनीजवळ, **पुणे ४११ ०४१.**
  ☎ (०२०) २४६९ ०२०४ **मो.** ९६५७७०३१४३ Email : bookorder@pragationline.com

**मुंबई**
- ३८५, एस.व्ही.पी. मार्ग, रसधारा को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि., गिरगाव, **मुंबई ४०० ००४.**
  ☎ (०२२) २३८५ ६३३९/२३८६ ९९७६ **फॅक्स :** (०२२) २३८६ ९९७६.
  **मो.** ९३२०१२९५८७ Email : niralimumbai@pragationline.com

**वितरक शाखा**

**निराली प्रकाशन :**
- ३४, व्ही. व्ही. गोलानी मार्केट, नवी पेठ, **जळगाव ४२५ ००१.** ☎ (०२५७) २२२ ०३९५.
  **मो.** ९४२३४९१८६० Email : niralijalgaon@pragationline.com
- न्यू महाद्वार रोड, केदार लिंग प्लाझा, पहिला मजला, आय. डी. बी. आय. बँकेसमोर,
  **कोल्हापूर ४१६ ०१२. मो.** ९८५० ०४६ १५५ Email : niralikolhapur@pragationline.com
- लोकरत्न कमर्शियल कॉम्प्लेक्स, दुकान नं. ३, सीतावर्डी, **नागपूर ४४० ०१२.**
  ☎ (०७१२) २५४७ १२९. Email : niralinagpur@pragationline.com

**Note :** Every possible effort has been made to avoid errors or omissions in this book. In spite this, errors may have crept in. Any type of error or mistake so noted, and shall be brought to our notice, shall be taken care of in the next edition. It is notified that neither the publisher, nor the author or book seller shall be responsible for any damage or loss of action to any one of any kind, in any manner, therefrom. The reader must cross check all the facts and contents with original Government notification or publications.

**इतर शाखा : दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई**

• www.pragationline.com

# प्रस्तावना ...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सन 2019-20 या शैक्षणिक वर्षापासून वाणिज्य विद्याशाखेतील प्रथम वर्षासाठी पुनर्रचित अभ्यासक्रम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जून 2019 पासून नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. Choice Based Credit System व Semester Pattern ही या नवीन अभ्यासक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. त्यानुसार **व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता** या विषयाचा पाठ्यक्रम दोन सत्रांमध्ये विभागण्यात आला आहे. त्यातील सत्र - 2 साठी निर्धारित केलेल्या पुनर्रचित पाठ्यक्रमासाठी उपयुक्त असलेले पुस्तक आपल्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता भाग**-2 या विषयाच्या पाठ्यक्रमातील उद्दिष्टांमध्ये उद्योजकीय वर्तन तसेच उद्योजकांच्या सवयी यांचा परिचय करून देणे, उद्योजकतेची गरज आणि महत्त्व स्पष्ट करणे, अर्थव्यवस्थेमधील उद्योजकाची भूमिका स्पष्ट करणे. उद्योकता विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थांचा परिचय करून देणे आणि महाराष्ट्रातील यशस्वी उद्योजकांबाबत माहिती यांचा प्रामुख्याने समावेश केला आहे.

भारताने 1991 साली नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर उद्योग व्यवसायासाठी अनुकूल आर्थिक पर्यावरण निर्माण झाले. उद्योग व उद्योजकांची संख्या झपाट्याने वाढली. उद्योजक हा इतर सामान्य व्यक्तींपेक्षा वेगळा असतो म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू, त्याच्या सवयी, तरुण उद्योजक म्हणून विद्यार्थ्यांना माहिती होणे महत्त्वाचे आहे तसेच उद्योजकता विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्था आणि यशस्वी उद्योजकांचा अभ्यास अशा महत्त्वाच्या घटकांचा समावेश नवीन पाठ्यक्रमात करण्याचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे.

प्रस्तुत पुस्तक लिहिताना ते निर्धारित पाठ्यक्रमास अधिकाधिक उपयुक्त व्हावे यासाठी पाठ्यक्रमातील प्रत्येक भागाचे सविस्तर व सोप्या भाषेत विवेचन केले आहे. विषयाशी संबंधित सर्व बारीकसारीक मुद्यांचा समावेश करून प्रत्येक मुद्द्यांचे सोप्या भाषेत सविस्तर स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच हे पुस्तक प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक व अभ्यासकांना उपयुक्त ठरेल. याबाबत निश्चितच खात्री वाटते. लेखनातील व स्पष्टीकरणातील चुका टाळण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. तरीदेखील वाचकांकडून येणाऱ्या सूचना व प्रतिक्रियांचे स्वागतच आहे.

प्रस्तुत पुस्तक लेखनाच्या कार्यात उपयोगात आलेल्या विविध संदर्भ ग्रंथांचे लेखक, अभ्यास मंडळ सदस्य, आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे पदाधिकारी, सहकारी प्राध्यापक, ग्रंथालयीन कर्मचारी, तसेच विविध महाविद्यालयांमधील प्राध्यापक मित्रांचे मोलाचे सहकार्य व प्रोत्साहन लाभले. त्यासाठी सर्वांचे शतशः आभार !

निराली प्रकाशन, पुणे या प्रकाशन संस्थेचे **श्री. दिनेशभाई फुरिया** आणि **श्री. जिग्नेशभाई फुरिया** यांनी आम्हाला पुस्तक लेखनाची संधी दिली याबद्दल आम्ही त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

**श्री. रवींद्र वाळोदरे** यांनी या पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ तयार केले तसेच निराली प्रकाशनच्या इतर सर्व कर्मचारी वर्गाच्या सहकार्यामुळे पुस्तक अल्पावधीत पूर्ण झाले. या सर्वांचे स्नेहपूर्वक आभार !

या पुस्तकातील काही त्रुटी व उणिवा आमच्या लक्षात आणून अभिप्राय दिल्यास आणि सूचना केल्यास त्याचे स्वागत करून पुढील आवृत्तीत त्यानुसार सुधारणा करण्याचा नक्की प्रयत्न केला जाईल.

धन्यवाद ! **लेखकवृंद**

# SYLLABUS

(New Syllabus from June 2019)

**F.Y.B.Com. – SEMESTER – II**

**BUSINESS ENVIRONMENT AND ENTREPRENEURSHIP – II**

**(CBCS Pattern)**

**COURSE CODE : 126 – (E)**

### 1. Entrepreneurial Behaviour

1. *Nature*
2. *Comparison between Entrepreneurial and Non-entrepreneurial Personality*
3. *Habits of Entrepreneurs*
4. *Dynamics of Motivation*

### 2. Entrepreneurship

1. **Concept :** *Need and Importance of Entrepreneurship*
2. *Economic Development and Industrialisation*
3. *Role of Entrepreneurship in Economy*
4. *Entrepreneur as a Catalyst*

### 3. Institutions Working for Promoting Entrepreneurship

1. *Entrepreneurship Development Institute of India (EDII)*
2. *Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED)*
3. *District Industries Centre (DIC)*
4. *Maharashtra Chamber of Commerce, Industries and Agriculture (MCCIA)*
5. *Role of Local NGO in Promoting Entrepreneurship*

### 4. Study of Entrepreneurs

1. *Hanumant Gaikwad (BVG)*
2. *Kiran Mazumdar Shaw*
3. *Suwasini Kirloskar*
4. *Any Successful Entrepreneur from your Area*

# अनुक्रमणिका

**1. उद्योजकीय वर्तन ........ 1.1 ते 1.27**

1.1 उद्योजक : अर्थ व व्याख्या
1.2 उद्योजकीय वर्तन : अर्थ व स्वरूप
1.3 उद्योजकीय व्यक्तिमत्त्व
1.4 उद्योजकाच्या सवयी
1.5 अभिप्रेरण/अभिप्रेरणांचे चलनशास्त्र

**2. उद्योजकता ........ 2.1 ते 2.28**

2.1 उद्योजकता
2.2 उद्योजकतेची गरज व महत्त्व
2.3 आर्थिक विकास आणि औद्योगिकीकरण
2.4 अर्थव्यवस्थेतील उद्योजकाची भूमिका
2.5 उद्योजक : एक उत्प्रेरक

**3. उद्योजकतेला चालना देण्यासाठी संस्थात्मक कार्य ..... 3.1 ते 3.44**

3.1 भारतीय उद्योजकता विकास संस्था
3.2 भारतीय उद्योजकता विकास संस्था
3.3 जिल्हा उद्योग केंद्रे (डीआयसी)
3.4 चेंबर ऑफ कॉमर्स
3.5 उद्योजकतेस प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांची भूमिका

**4. उद्योजकांचा अभ्यास ........ 4.1 ते 4.20**

4.1 श्री. हणमंतराव गायकवाड (बीव्हीजी)
4.2 श्रीमती किरण मुजुमदार शॉ (बायोकॉन)
4.3 श्रीमती सुहासिनी किर्लोस्कर
4.4 आपल्या भागातील कोणताही एक यशस्वी उद्योजक : श्री. देवानंद लोंढे

➲ **संदर्भ ग्रंथ सूची ........ 1 ते 1**

➲ **नमुना प्रशनपत्रिका ........ 1 ते 2**

# 1

# उद्योजकीय वर्तन

## (Entrepreneurial Behaviour)

*** महत्त्वाचे मुद्दे ***

**1.1 उद्योजक : अर्थ व व्याख्या**

**1.2 उद्योजकीय वर्तन: अर्थ व व्याख्या**

1.2.1 अर्थ

1.2.2 व्याख्या

1.2.3 उद्योजकीय वर्तनाचे स्वरूप

1.2.4 उद्योजकीय वर्तनाचे दृष्टिकोन

1.2.5 उद्योजकीय वर्तनाचे महत्त्व

**1.3 उद्योजकीय व्यक्तिमत्त्व**

1.3.1 व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप

1.3.2 उद्योजकीय व बिगर-उद्योजकीय व्यक्तिमत्त्व यांच्यातील तुलना

**1.4 उद्योजकाच्या सवयी**

**1.5 अभिप्रेरण/अभिप्रेरणांचे चलनशास्त्र**

1.5.1 अभिप्रेरणा-संकल्पना

1.5.2 अभिप्रेरणेचे स्वरूप

1.5.3 अभिप्रेरणेचे घटक

जी व्यक्ती पूर्वनियोजित उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून, जोखीम पत्करून स्वतःचा उद्योग सुरू करण्याचे धाडस करते. त्या व्यक्तीस उद्योजक असे म्हणतात. प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासात उद्योजक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतो. भूमी, श्रम, भांडवल, कच्चा माल, नैसर्गिक साधनसंपत्ती या घटकांबरोबरच उद्योजक हा घटकदेखील उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी महत्त्वाचा असतो. आज जगातील ज्या अर्थव्यवस्थांना आपण विकसित अर्थव्यवस्था म्हणून ओळखतो त्या अर्थव्यवस्थांचा विकास उद्योजकांमुळेच झाला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कोणत्याही देशाचा विकास हा औद्योगिकीकरण व त्याच्या वेगावर अवलंबून असतो तर औद्योगिकीकरणाचा वेग देशातील उद्योजकांची उपलब्धता व त्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो.

उद्योजक म्हणजे नवनिर्मिती करणारा. उद्योजकांनी केलेल्या नवनिर्मितीमुळे उत्पादन कार्यात मूलभूत बदल घडून येतात. अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती प्राप्त होते व सर्वसामान्य जनतेचे आयुष्य सुखकर बनते. म्हणजेच उद्योजकाच्या कार्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळते. उद्योजक व उद्योजकता या संकल्पनांमध्ये काळानुरूप बदल होत गेला असला तरी उद्योजकाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व तसूभरही कमी झालेले नाही. त्याकरिता उद्योजक या संकल्पनेचा अर्थ व व्याख्या समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

## 1.1 उद्योजक : अर्थ व व्याख्या

औद्योगिक विकासासाठी भांडवल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान व कामगारांची आवश्यकता असते. हे घटक आपल्याला सहजपणे मिळविता येतात किंवा देशात उपलब्ध नसल्यास आयात करता येतात. परंतु उद्योजकता आयात करता येत नाही. तर तो गुण देशातील उद्योजकांमध्येच असावा लागतो. म्हणून देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने उद्योजकास अनन्यसाधारण महत्त्व आहे. उद्योगातील जोखीम स्वीकारून, उत्पादनाची विविध संसाधने एकत्रित करून उत्पादनासाठी त्यांचा वापर करण्याबाबतचा निर्णय घेणारा व्यक्ती म्हणजे उद्योजक अशी उद्योजकाची सर्वसामान्य व्याख्या केली जाते. उद्योजक हा स्वतःकडील भांडवल उत्पादन कार्यात गुंतवून एक प्रकारे जोखीम स्वीकारत असतो. पण स्वतःच्या कल्पना, कुशलता, निर्णय प्रक्रिया व नवनिर्मितीवर त्याला प्रचंड विश्वास असतो. तो भूमी, श्रम, भांडवल, कच्चा माल इ. उत्पादन घटकांना एकत्र आणून त्यांच्या विशिष्ट संयोगातून नवनिर्मिती करतो व उत्पादनाची विक्री करून नफा प्राप्त करतो.

***व्याख्या***

उद्योजक संज्ञेच्या उत्पत्तीपासून ते आतापर्यंत या संज्ञेने अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. काळाच्या ओघात उद्योजकाचा अर्थ आणि कार्य यातही बदल झाला. बदल हा प्रगतीचे लक्षण असतो आणि तो अधिकाधिक प्रगत अवस्थेकडे घेऊन जातो. यानुसारच

उद्योजक या शब्दाचा अर्थ बदलत जाऊन तो अधिक प्रगल्भ व व्यापक झाला आहे.. पुढील व्याख्यांवरून उद्योजक ही संज्ञा अधिक स्पष्ट होईल.

- ''भांडवल आणि श्रम यामध्ये मध्यस्थी करून उद्योगाची किंवा उपक्रमाची स्थापना करणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय.'' - **ऑक्सफर्ड शब्दकोश**
- ''उत्पादनाची साधने निश्चित किमतीला खरेदी करून त्यांच्यापासून उत्पादन तयार करून ते अनिश्चित किमतीला विकणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय.'' **- रिचर्ड कॅन्टीलॉन**
- ''उद्योजक हा आर्थिक मध्यस्थ असून तो उत्पादनाचे सर्व घटक एकत्रित करतो. एकाचे श्रम, दुसऱ्याचे भांडवल किंवा भूमी असे उत्पादनाचे घटक एकत्र करून त्यांच्या साहाय्याने वस्तू बनवितो आणि त्या वस्तू विकून आलेल्या मूल्यातून भांडवलावरील व्याज, श्रमासाठी मजुरी व भूमीसाठी खंड देऊन स्वतःसाठी नफा प्राप्त करतो.'' **- जे. बी. से**
- ''उद्योजक म्हणजे नवनिर्मिती करणारी व्यक्ती होय. त्यामुळे उत्पादनाच्या साधनांचे नवीन संयोगीकरण घडून येते, अर्थव्यवस्थेच्या स्थिर समतोलाला धक्का बसतो व आर्थिक विकासाला गती येते.'' **- जोसेफ शुम्पीटर**
- ''परिवर्तनाचा सातत्याने शोध घेणारी, परिवर्तनाला प्रतिसाद देणारी आणि त्याचा संधी म्हणून उपयोग करून घेणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय.'' **- पीटर ड्रकर**

वरीलप्रमाणे वेगवेगळ्या अर्थतज्ज्ञांनी उद्योजक या संकल्पनेच्या वेगवेगळ्या व्याख्या मांडल्या आहेत. उद्योजकाची तंतोतंत एकच अशी व्याख्या मांडता येणे अवघड आहे. कारण उद्योजकाची कार्ये अतिशय विस्तृत बनली असून स्थळ, काळ व उद्योगानुसार त्यात बदल झालेला आढळून येतो. तरीदेखील वरील व्याख्यांचा विचार करता उत्पादनासाठी आवश्यक भूमी, श्रम, भांडवल, यंत्रे, कच्चा माल इत्यादींची जमवाजमव करून स्वतःच्या निर्णय व नवनिर्मिती क्षमतेच्या जोरावर त्यांचे योग्य संयोग तयार करून उत्पादन करतो व त्याच्या विक्रीपासून अधिकाधिक नफा प्राप्त करतो अशा व्यक्तीस उद्योजक म्हणता येईल.

## 1.2 उद्योजकीय वर्तन : अर्थ व व्याख्या

कोणत्याही व्यवस्थापनामध्ये मानवी वर्तन सामान्यतः तेथे काम करणाऱ्या लोकांच्या विचार, भावभावना आणि कृतींशी संबंधित असते. कोणत्याही उद्योजकाचे यश प्रामुख्याने उद्योजकाची कार्यक्षमता आणि कार्य कुशलता यावर अवलंबून असते आणि उद्योजकाची कार्यक्षमता मुख्यतः त्याच्यातील मानवी कौशल्यावर आणि तो उद्योगात काम करणाऱ्या लोकांच्या गरजा, त्यांच्या इच्छा व त्यांच्या क्षमता याबद्दल किती चांगले जाणतो यावर अवलंबून असते. म्हणजेच उद्योजकीय वर्तन हे उद्योगातील मानवी वर्तन समजून घेणे,

त्याबद्दल अंदाज करणे तसेच उद्योगातील मानवी वर्तनाचे नियंत्रण करणे याच्याशी प्रत्यक्षपणे संबंधित असते.

### 1.2.1 अर्थ

उद्योजकाद्वारे केले जाणारे वर्तन हे नावीन्याचा शोध व नवोपक्रम यांच्याशी संबंधित असते. म्हणजेच काहीतरी नवीन शोधून काढणे आणि समाजातील व्यक्तींपर्यंत नावीन्यपूर्ण अशा वस्तू व सेवांचा पुरवठा करणे यांमधून उद्योजकीय वर्तन दिसून येते. उद्योजकीय वर्तनामध्ये नवनिर्मिती करण्याची आणि अस्तित्वात असलेली स्थिती बदलण्याची तीव्र इच्छा असते. उद्योजक नवनिर्मिती करणे हे आपल्या जीवनाचे ध्येय समजतो आणि अस्तित्वातील स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी प्रेरित असतो. जोसेफ शुम्पीटर यांनी नवनिर्मिती हे उद्योजकाचे सर्वांत मुख्य कार्य मानले आहे. उद्योजकाच्या अंगी सर्जनशीलता असल्याने तो नवनिर्मिती करू शकतो असे शुम्पीटर यांचे मत आहे. शुम्पीटर यांच्या नवनिर्मिती या संकल्पनेमध्ये नवीन वस्तू निर्माण करणे, उद्योगाचे नवीन प्रकारे संघटन करणे, नवीन उत्पादन पद्धती वापरणे, नवीन बाजारपेठ मिळविणे, वस्तू वितरणाचे नवीन मार्ग शोधणे या गोष्टींचा समावेश होतो.

नफा मिळविण्याच्या आणि औद्योगिक विकासाच्या उद्देशाने नवीन व्यावसायिक संधींचा शोध आणि त्या संधींचा फायदा करून घेण्याच्या दृष्टीने उद्योजकाने केलेल्या विविध क्रियांचा समावेश उद्योजकीय वर्तनामध्ये होतो. यामध्ये

1. नवीन व्यवसायाच्या संधीची ओळख,
2. त्या संधीचा उपयोग करून घेण्यासाठी नवीन उद्योगाची स्थापना आणि
3. पुढील काळात उद्योगाची भरभराट होण्यासाठी उद्योगाचे योग्य व्यवस्थापन.

या तीन महत्त्वाच्या पायऱ्यांचा समावेश होतो.

### 1.2.2 व्याख्या

✯ ''उद्योजकीय वर्तन हा उद्योजकीय क्रियांचा एक उपसंच आहे की जो उद्योजकीय क्रियांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींचे वर्तन समजून घेणे याबाबत अंदाज करणे आणि त्यावर प्रभाव पाडणे याच्याशी संबंधित आहे.'' **– हेन्री काहन**

✯ ''नवीन उद्योग स्थापन करणे आणि त्याचा विकास करणे तसेच नवीन संधींचा शोध घेणे व नवीन संधी निर्माण करणे या उद्योजकीय वर्तनाशी संबंधित मानवी वर्तणुकीचा अभ्यास म्हणजे उद्योजकीय वर्तन होय.'' **– बर्ड अँड शोजेड**

✯ ''उद्योजकीय वर्तन सामाजिक बदलांचा पुरस्कार, नवनिर्मिती करण्याची आणि अस्तित्वात असलेली स्थिती बदलण्याची तीव्र इच्छा यांच्याशी संबंधित आहे.''

**– कुराटो, आयर्लंड, कोव्हिन आणि हॉर्नस्बी**

### 1.2.3 उद्योजकीय वर्तनाचे स्वरूप

उद्योजकीय वर्तनाच्या वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की, उद्योगातील मानवी घटकांशी आंतरक्रिया साधण्याबरोबरच उद्योग उभारणीपासून ते ग्राहकांपर्यंत वस्तू पोहोचविण्यापर्यंतच्या उद्योजकीय क्रियांमध्ये उद्योजकाचे वेळोवेळी प्रतिबिंबित होणारे वर्तन किंवा उद्योजकातील विविध गुणांचा संच म्हणजे उद्योजकीय वर्तन असे म्हणता येईल. नवीन संधींचा शोध घेणे व त्या संधींचा उद्योगाच्या उभारणीसाठी व नवनिर्मितीसाठी उपयोग करून घेणे या उद्योजकाच्या प्रमुख कार्याशी संबंधित उद्योजकीय स्वभावाचे अनेक पैलू समोर येतात. वरील विवेचनावरून उद्योजकीय वर्तनाचे स्वरूप किंवा पैलू पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

(1) **महत्त्वाकांक्षा :** उद्योजकाला आपल्या उद्योगात यशस्वी होण्यासाठी महत्त्वाकांक्षा या गुणाची नितांत आवश्यकता असते. केवळ उच्च महत्त्वाकांक्षेमुळेच उद्योजकाचे व्यक्तिमत्त्व आकारास येते. महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय उद्योजकतेचा विकास होऊच शकत नाही. नवीन वस्तूंची निर्मिती करण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळेच उद्योजकाच्या नवनिर्मितीला चालना मिळते. म्हणूनच उद्योजकांमध्ये महत्त्वाकांक्षा हा गुण असणे आवश्यक आहे. केवळ महत्त्वाकांक्षेच्या आधारावरच उद्योजक यशाची उत्तुंग शिखरे गाठू शकतो.

(2) **सर्जनशीलता :** सर्जनशीलता म्हणजे नवीन गोष्ट करण्याची क्षमता होय. सर्जनशीलता हे उद्योजकाचे मूलभूत गुणवैशिष्ट्य असते. उद्योजक ग्राहकांना यापूर्वी माहीत नसलेल्या नवीन वस्तूंचे उत्पादन करतो, नवनवीन उत्पादन पद्धती उपयोगात आणतो, उत्पादन साधनांचा व मनुष्य बळाचा पर्याप्त वापर कसा होऊ शकेल या दृष्टीने नावीन्यपूर्ण पद्धतींचा वापर करतो, उद्योगात नावीन्यपूर्ण संघटन अमलात आणतो, तसेच कमीत कमी खर्चात दर्जेदार वस्तूंचे उत्पादन कसे करता येईल याबाबत उद्योजक सातत्याने विचार करून कृती करत असतो. सर्जनशीलता या गुणाच्या बळावरच उद्योजक यश मिळवितात. समाजाला नवीन व दर्जेदार वस्तू उपलब्ध करून देतात.

(3) **व्यावसायिक पर्यावरणाबाबत जागरूकता :** व्यावसायिक पर्यावरणातील घटक एकमेकांवर परिणाम करणारे व नेहमी बदलत्या स्वरूपाचे असतात. या बदलत्या घटकांचे भान ठेवून त्यास अनुरूप असे निर्णय उद्योजकाला घ्यावे लागतात. त्यासाठी व्यावसायिक पर्यावरण व त्या संबंधित घटकांचे परस्परसंबंध याबाबत उद्योजकाला ज्ञान असणे आवश्यक असते. तसेच व्यावसायिक पर्यावरणातील घटकांमधील बदलांना सामोरे जाताना त्या बदला नुसार स्वतःमध्ये व स्वतःच्या उद्योगामध्ये बदल करून घेण्याची तयारी उद्योजकाची असते.

(4) **स्वतंत्र विचार करण्याची शक्ती :** उद्योजक हा स्वतंत्र विचाराचा स्वयंभू असा नेता असतो. आपल्या डोक्यातील कल्पना सत्यात उतरविण्यासाठी त्याची धडपड

सुरू असते. यासाठी त्याची काहीही करण्याची तयारी असते. कारण त्याला त्याच्या विचारांवर, सर्जनशीलतेवर, कौशल्यांवर व निर्णय प्रक्रियेवर आत्मविश्वास असतो. उद्योगाबाबतचा कोणताही निर्णय हा उद्योजकाचा स्वतःचा निर्णय असतो. त्यामुळे त्याच्या परिणामांची जबाबदारीदेखील उद्योजक घेत असतो. इतरांच्या नियंत्रणाखाली किंवा दुसऱ्याच्या विचाराने काम करणे हा उद्योजकाचा स्वभाव नसतो. त्यामुळेच इतरांच्या सांगण्याप्रमाणे निर्णय घेणे ही कल्पनाच उद्योजकाला रुचत नाही. स्वतःच्या विचारशक्तीला व कल्पनाशक्तीला वाव देणे आणि त्यानुसार निर्णय घेण्यात उद्योजकाला धन्यता वाटते.

**(5) शोधक वृत्ती :** उद्योजकता ही संशोधनावर आधारित प्रक्रिया आहे. संशोधन हेच उद्योजकाचे खरे सामर्थ्य आहे. उद्योजक हा बाजारातील मागणी व ग्राहकांचा विचार करून वस्तूची निर्मिती करीत असतो. आपली वस्तू ग्राहकांच्या पसंतीस पडावी म्हणून तो नेहमी नवनिर्मितीसाठी प्रयत्नशील असतो. तो आपल्या व्यवसायामध्ये सातत्याने काहीतरी नवीन संशोधन करण्यासाठी धडपड करत असतो. कारण त्याला त्याच्या कार्याचा मोबदला म्हणून मिळणारा नफा हा त्याच्यातील संशोधक वृत्तीवरच अवलंबून असतो. सध्याच्या स्पर्धायुक्त परिस्थितीत उद्योजकाला इतर उद्योगांच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी आपल्या उत्पादनातील नावीन्यपूर्णता टिकवून ठेवणे आवश्यक असते. त्यावरच त्याच्या व्यवसायाचे अस्तित्वदेखील अवलंबून असते. शोधक वृत्ती असणारे उद्योजक साधनसामग्री व मनुष्यबळाचा पर्याप्त वापर करून खर्चात बचत करून अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात. तसेच सातत्याने नवनवीन पद्धती, उत्पादन साधनांचे नवनवे संयोग, नवीन बाजारपेठा, नवीन वस्तू इत्यादींबाबत संशोधन करण्यात किंवा अस्तित्वात असलेल्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी उद्योजक प्रयत्नशील असतो. म्हणजेच शोधक वृत्ती हा उद्योजकाचा स्थायिभाव असणे आवश्यक आहे.

**(6) नवनिर्मिती क्षमता :** संशोधकांमध्ये नावीन्याचा ध्यास घेण्याची वृत्ती असणे आवश्यक आहे. बाजारात नावीन्यपूर्ण वस्तूंना अधिक मागणी असते. वस्तूतील नावीन्य कमी झाले की वस्तूची मागणीदेखील कमी होते. या दृष्टीने बाजारात नवनिर्मितीला अनन्य-साधारण महत्त्व आहे. शुम्पीटर यांच्या मते, उद्योजक म्हणजे नवनिर्मिती करणारी व्यक्ती होय. नवनिर्मितीच्या साहाय्याने तो आपला नफा महत्तम करण्याचा प्रयत्न करतो. उद्योजकाला भविष्यातील संधी अधिक स्पष्ट दिसतात आणि तो नवीन उत्पादने, नवीन उत्पादन पद्धती, नवीन बाजारपेठा, उत्पादन घटकांचे नवनवीन संयोग यांच्या साहाय्याने भविष्यातील संधींचा पुरेपूर फायदा उठवितो. उद्योजक बाजारातील परिस्थितीचा, ग्राहक वर्गाच्या मानसिकतेचा तसेच भविष्यात निर्माण होणाऱ्या मागणीचा सूक्ष्म रीतीने अभ्यास करून ग्राहकांच्या पसंतीस पडेल असे उत्पादन निर्माण करण्यावर भर देतो. नवीन संशोधनाच्या साहाय्याने आपल्या वस्तूंमध्ये इतर स्पर्धक वस्तूंच्या मानाने नावीन्यता

निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. यावरून उद्योजकांमध्ये नवनिर्मितीची क्षमता हा गुण अतिशय महत्त्वाचा असल्याचे दिसून येते.

**(7) तांत्रिक ज्ञान :** ज्याप्रमाणे वाहन चालविणाऱ्या व्यक्तीला वाहनाबाबतचे तांत्रिक ज्ञान असणे आवश्यक असते त्याचप्रमाणे उद्योजकाला त्याच्या व्यवसायाबाबत तांत्रिक ज्ञान असावे लागते. याशिवाय व्यवसायातील अनेक गुंतागुंतीच्या क्रियांवर तो नियंत्रण ठेवू शकत नाही. उत्पादनासाठी आवश्यक यंत्रसामग्री व नवीन तंत्रज्ञान याबाबत अद्ययावत माहिती त्याच्याकडे उपलब्ध असणे आवश्यक असते. तसेच उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अथवा उद्योगाशी संबंधित यंत्रांबाबत तांत्रिक ज्ञान उद्योजकाकडे असावे. आधुनिक काळात उद्योग क्षेत्रात संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. उत्पादन व दैनंदिन कामांमध्ये संगणकाचा योग्य पद्धतीने वापर करून घेण्यासाठी स्वतः उद्योजकाकडे संगणक व त्याच्या वापराबाबतचे ज्ञान असणे आवश्यक आहे. नवीन बाजारपेठेचा शोध घेणे, जगातील नावीन्यपूर्ण घडामोडींची माहिती घेणे, जगाच्या कानाकोपऱ्यातून आपल्याला आवश्यक कच्चा माल अथवा यंत्रे खरेदी करणे, आपल्या उत्पादनाच्या ऑर्डर्स मिळविणे, उत्पादित माल जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविणे आणि बँकेचे दैनंदिन व्यवहार करण्यासाठी उद्योजकाकडे तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता भासते.

**(8) व्यवस्थापकीय कौशल्य :** उद्योजक हा उत्कृष्ट व्यवस्थापक असणेदेखील गरजेचे असते. स्वतःच्या भांडवलावर, स्वकष्टाने उभ्या केलेल्या उद्योगाचे व्यवस्थापन उद्योजकापेक्षा उत्तम रीतीने दुसरा व्यक्ती करू शकत नाही. यासाठीच चांगल्या व्यवस्थापकामध्ये अपेक्षित असलेली सगळे गुणवैशिष्ट्ये व्यवस्थापकामध्ये असणे आवश्यक आहे. नियोजन, संघटन, समन्वय, संदेशवहन इ. व्यवस्थापकीय कौशल्ये व्यवस्थापका-जवळ असतील तर तो आपल्यासोबत काम करणाऱ्या मानवी संसाधानांसाठी एक प्रेरणा-स्रोत बनू शकतो. कोणत्या व्यक्तीवर कोणती जबाबदारी सोपवावी, मानवी संसाधनांचा अधिकाधिक कार्यक्षम वापर कसा करावा, उत्पादन कार्यात गुंतलेल्या सर्व कामगारांमध्ये व संबंधित व्यक्तींमध्ये समन्वय कसा ठेवावा याबाबतचे ज्ञान उद्योजकाकडे असावे लागते.

**(9) निर्णयक्षमता :** उद्योजकाला आपल्या उद्योगाचा दैनंदिन कारभार करताना वेगवेगळ्या परिस्थितीत निर्णय घ्यावे लागतात. व्यवस्थापकाचे यश हे त्याने योग्य वेळी घेतलेल्या योग्य निर्णयावर अवलंबून असते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अगदी उद्योजक बनण्याचा निर्णय घेण्यापासून ते यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविण्यापर्यंतच्या प्रवासात त्याचे यशापयश हे त्याच्या निर्णयक्षमतेवर अवलंबून असते. कोणतीही व्यक्ती निर्णयक्षमतेचा गुण घेऊन जन्माला आलेली नसते. तर आपले निरीक्षण, अभ्यास, अनुभवांच्या साहाय्याने उद्योजकांमध्ये निर्णयक्षमता विकसित होत असते. उद्योजकाने घेतलेला योग्य निर्णय त्याला यशाच्या शिखरावर पोहोचवू शकतो किंवा निर्णय

चुकल्यास त्याला प्रचंड नुकसान सहन करावे लागू शकते. उपलब्ध आकडेवारी, माहिती, दूरदृष्टी, वास्तवतेचे भान, संशोधक वृत्ती, अंदाज इत्यादींच्या जोरावर उद्योजक बऱ्याच वेळा धाडसी निर्णय घेत असतो. त्याने घेतलेल्या प्रत्येक निर्णयातून त्याचा आत्मविश्वास व अनुभव वाढत जातो. म्हणूनच उद्योजकासाठी त्याच्यातील निर्णयक्षमता हा अतिशय महत्त्वाचा आणि त्याच्या भविष्यावर थेट परिणाम करणारा असा गुण आहे.

(10) **संदेशवहन कौशल्य :** यशस्वी उद्योजकाच्या अंगी उत्कृष्ट संदेशवहन कौशल्य असते. उद्योगसंस्थेच्या अपेक्षित कार्यपूर्तीच्या उद्देशाने उद्योजकाने आपल्या उपक्रमात प्रभावी संदेशवहन व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असते. तसेच उद्योगातील संदेशवहन यंत्रणेमध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करणे व ती टिकवून ठेवणे याकडेदेखील लक्ष देणे महत्त्वाचे ठरते. प्रभावी संदेशवहनामुळे व्यवस्थापन कार्य प्रभावीपणे पार पाडण्यास मदत होते. तर संदेशवहनातील गोंधळामुळे उद्योगाला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते. कीथ डेव्हिस यांच्या मते, मनुष्याच्या शरीरामध्ये रक्तवाहिन्यांना जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व उद्योगसंस्थेत संदेशवहन यंत्रणेला आहे. उद्योजकाच्या अंगी उत्कृष्ट संदेशवहन कौशल्य असल्यास तो आपल्या कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रकारे कार्य करून घेऊ शकतो. तसेच कच्च्या मालाचा पुरवठा करणारे, विक्रेते, जाहिरातदार आणि उद्योगसंस्थेशी संबंधित इतर व्यक्ती व संस्था यांच्यामध्ये योग्य समन्वय ठेवू शकतो. म्हणजेच यशस्वी उद्योजक होण्यासाठी संदेशवहन हे कौशल्य अतिशय महत्त्वाचे ठरते.

(11) **नेतृत्व गुण :** उद्योजक हीच आपल्या उपक्रमाचे नेतृत्व करणारी व्यक्ती असते. आपल्या व्यवसायात काम करणाऱ्या व व्यवसायावर अवलंबून असलेल्या सर्व मानवी संसाधनांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी उद्योजकावर असते. त्यामुळे उद्योजकातील नेतृत्व गुण अतिशय महत्त्वाचे ठरतात. त्याच्या चांगल्या नेतृत्वामुळे कामगारांमध्ये परस्पर सहकार्य, उद्योगसंस्थेबद्दल बांधीलकी, झोकून देण्याची वृत्ती निर्माण होते व त्यातून उपक्रमाची यशस्वितेकडे होणारी वाटचाल सुकर बनते. सामान्यपणे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीकडे इतरांपेक्षा अधिक बुद्धिमत्ता, दूरदृष्टी, उपक्रमशीलता, दृढनिश्चय, आत्मविश्वास, समायोजन कौशल्य, इतरांच्या भावनांची कदर करण्याची वृत्ती, संघटन कौशल्य, संयम, वक्तृत्व इ. गुण असावे लागतात. असे गुण उद्योजकाकडे असतील तर तो उपलब्ध मनुष्यबळाच्या साहाय्याने कामाचे योग्य नियोजन करू शकतो. योजना आखणे, धोरण ठरविणे, धोरणांची अंमलबजावणी करणे व त्यासाठी कार्यविभागणी करणे इत्यादी कामे उत्कृष्टपणे करू शकतो. त्यासाठी त्याच्या अंगी नेतृत्व गुण असणे आवश्यक आहे.

(12) **दूरदृष्टी** : उद्योजक भविष्यकाळाचा अंदाज घेऊन आणि भूतकाळातील अनुभवांच्या साहाय्याने आपले वर्तमानकालीन निर्णय घेतो. उद्योजकाने निर्णय घेताना भविष्यकाळाचा अचूक वेध घेणे निर्णायक ठरते. पुढील 10-15 वर्षांत उद्योजक आपल्या

# [illegible] - II




Publisher : Nirali Prakashan

ISBN : 9789389686777

Author : [illegible]

Type the URL :https://www.kopykitab.com/product/46363

Get this eBook